# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१४/ 1178

दिनांक : 09 APR 2015

प्रति,
संचालक /प्राचार्य
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदवी /औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती करण्याबाबत...........

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/२४६, दि. ०४/०४/२०१५

२. या कार्यालयामार्फत दि. २१/१०/२०१४ व दि. ३१/१०/२०१४ रोजी घेतलेल्या कार्यशाळा व वेळोवेळी निर्गमीत करण्यांत आलेली परिपत्रके

सर्व खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी आर्थिक मागास प्राप्त लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरलेले असतील अशा विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न/लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना तात्काळ सूचित करण्यांत यावे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही आधारकार्ड नोंदणी केलेली नसेल अशा विद्यार्थ्यांकरिता आपल्या संस्थेने आपल्या विभागातील संबंधीत एजंन्सीशी संपर्क साधावा. व संबंधीत एजन्सीचा कँप आपल्या संस्थेत नियुक्त करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर पूर्ण करावी. आर्थिकदृष्ट्या मागास असलेला एकही विद्यार्थी त्यापासून वंचित राहणार नाही. याची संबंधीत संस्थेने व्यक्तीशः काळजी घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिक मागास पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच आधार कार्ड क्रमांक संलग्न केलेले त्यांचे बँक खाते क्रमांकाबाबतची माहिती संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरील EBC Scholarship प्रणाली मध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना संस्थांनी सूचित करावे. जेणेकरुन शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करणेबाबतची कार्यवाही करणे सुलभ होईल.

तसेच सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या छाननी पश्चात याद्या ऑनलाईन ईबीसी प्रणालीच्या मेसेज बॉक्समध्ये पाठविण्यांत आल्या आहेत व काही संस्थांच्या याद्या पाठविण्याची कार्यवाही चालू आहे. त्यामध्ये सर्व संस्थांना १० कार्यालयीन दिवसांमध्ये त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे. परंतु काही संस्थांनी जवळ जवळ महिना उलटूनही अद्याप त्रुटींची पूर्तता केलेली नाही. अशा सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, विहीत कालावधीनंतरही ज्या संस्था त्रुटींची पूर्तता करणार नाहीत. अशा सर्व संस्थांमधील त्रुटी काढलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता रिजेक्ट करण्यांत येतील. याची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई